महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६१ वे | दिनांक : २१/०२/२०२६ | वार : शनिवार

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताचे सार्वभौमत्व विकले : प्रकाश आंबेडकर



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे सार्वभौमत्व विकल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. भारत आतापर्यंत स्वतःच्या सुरक्षेचे निर्णय स्वतः घेत होता. त्यामुळे आपल्या लढाऊ विमानांच्या चाव्या परकीय राष्ट्राच्या हाती असणे हे राष्ट्रीय सुरक्षा, स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वासाठी एक मोठा धोका आहे. मोदींनी स्वतःची व भारताच्या सार्वभौमत्त्वाची अमेरिकेला विक्री केली आहे, असे ते म्हणालेत.

भारताने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी बहुतांश विमानांची भारतात निर्मिती होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर भारताच्या सार्वभौमत्त्वाची विक्री केल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, नरेंद्र मोदींनी भारताचे सार्वभौमत्व विकले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये, अमेरिकन कंपनी Loar Group ने फ्रेंच कंपनी एलएमबी एरोस्पेस विकत घेतली. एलएमबी एरोस्पेस राफेल विमानाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि रडारसाठी अंतर्गत जीवन-समर्थन प्रणाली म्हणून काम करणारे विशेष उच्च-कार्यक्षमता असलेले कूलिंग फॅन आणि इलेक्ट्रिक मोटर्स पुरवते.

फ्रान्सने राफेल आयटीएआर-मुक्त असल्याचा दावा केला आहे. म्हणजेच ते अमेरिकेच्या नियंत्रणापासून स्वतंत्र आहे. एलएमबी ही एक फ्रेंच कंपनी आहे. त्यामुळे तिच्या राफेल विमानांचे सुटे भाग परदेशी खरेदीदारांना निर्यात आणि विक्री करण्यासाठी अमेरिकेची मंजुरी घेण्याची गरज नव्हती. तथापि, आता एलएमबीची मालकी एका अमेरिकन कंपनीकडे आली आहे. त्यामुळे आता या कंपनीकडून तयार करण्यात येणारे सुटे भाग युनायटेड स्टेट्स म्युनिशन लिस्ट (USML) मध्ये समाविष्ट केले जाऊ शकतात.

याचा अर्थ असा की एलएमबीने उत्पादित केलेल्या आणि भारताला निर्यात केलेल्या या सुट्या भागांच्या भविष्यातील खरेदीवर अमेरिकन सरकार मागच्या दरवाज्याने नियंत्रण मिळवू शकते. हे महत्त्वाचे भाग पुरवणाऱ्या कंपनीवर नियंत्रण ठेवून, अमेरिका आता एलएमबीने उत्पादित केलेल्या दुरुस्ती आणि सुट्या भागांवर नियंत्रण ठेवेल. भारत आतापर्यंत स्वतःच्या सुरक्षेचे निर्णय स्वतः घेत होता. त्यामुळे आपल्या लढाऊ विमानांच्या चाव्या परकीय राष्ट्राच्या हाती असणे हे राष्ट्रीय सुरक्षा, स्वातंत्र्य व सार्वभौमत्त्वासाठी एक मोठा धोका आहे, असे आंबेडकरांनी म्हटले आहे.

प्रश्न हा आहे की, मोदी राफेल का खरेदी करत आहेत रशियन बनावटीचे Su-५७E का नाही? मोदींनी अमेरिकेला विकले गेलेत. त्यांनी भारताचे सार्वभौमत्वही अमेरिकेला विकले आहे, असा आरोपही प्रकाश आंबेडकरांनी या प्रकरणी केला आहे.

## छगन भुजबळ राज्यसभेवर? अजित पवार यांच्या वक्तव्याचा अमोल कोल्हे कडून गौप्यस्फोट



**पुणे :** अभिनेते व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांचे पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. परंतु, या व्याख्यानाला काही संघटनांनी विरोध केल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठात पोलिसांचा बंदोबस्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अमोल कोल्हे यांनी पत्रकारांशी संवाद देखील साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की, जोपर्यंत तुम्ही छत्रपती मांडताय तोपर्यंत या महाराष्ट्रात कोणाच्या बापाला घाबरायचे नाही. तसेच छगन भुजबळ हे राज्यसभेवर जातील, असे अजितदादा ओघात म्हणाले असल्याचा गौप्यस्फोट देखील कोल्हे यांनी केला आहे.

पत्रकारांशी बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, मला विरोध का केला गेला हे मला माहित नाही. परंतु सावित्रीबाई फुले विद्यापीठाने मला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जे व्याख्यान आयोजित करायचे होते, या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी ही मागणी केली होती. त्यानुसार मला विद्यापाठाणे निमंत्रण दिले. मला आत्ता काही माध्यमकर्मींकडूनच समजत आहे की काही संघटनांनी मला विरोध केला आहे. परंतु, यांची कुठलीही कल्पना नाही. आज मी इतह इथे आलो आहे. माझी विरोध करणाऱ्यांना विनंती आहे, की त्यांनी माझे व्याख्यान ऐकावे आणि प्रश्न विचारा.

पुढे बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, विरोध करणे ही काही नवीन गोष्ट नाही. कारण ज्या छत्रपतींच्या विषयी बोलायला येतोय, त्या शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला देखील विरोध झाला आहे. याच पुण्यात त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याला देखील विरोध झाला आहे. पहिला पुतळा उभारण्याला सुद्धा विरोध झाला आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी ही तब्बल १८० वर्ष लोकांच्या स्मरणात राहिली नाही. याही वस्तुस्थिती आहेत. त्यामुळे मला असे वाटते की कुठलेही व्याख्यान करणे विद्यार्थ्यांशी संवाद साधणे हा वैचारिक भाग आहे. आणि मी जेव्हाही छत्रपतींची भूमिका साकारतो तेव्हा राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून करतो.

तसेच मला असे वाटते की जेव्हा विरोधाला चेहरा नसतो तेव्हा विचारांची भीती ही त्यांच्या मनात बसलेली असते तेव्हा विरोधाला असा कोणतातरी मुखवटा घेऊन पुढे यायचा प्रयत्न होतो, तसा काही प्रकार असेल, असे अमोल कोल्हे यांनी म्हटले. तसेच चेहरा जर समोर आला असता आणि नेमका काय विरोध आहे हे कळले असते तर मला त्यांच्याशी संवाद सधायला बरं वाटलं असतं, असेही कोल्हे यांनी म्हटले.

पुढे बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, छत्रपती मांडत असताना बाबा कधी कोणाला घाबरायचं नसतं, कधी कोणाचा इतर विचार करायचा नसतो. जोपर्यंत तुम्ही प्रामाणिकपणे छत्रपती मांडताय न तोपर्यंत कोणाच्या बापाला या महाराष्ट्रात घाबरायचे कारण नाही.

दरम्यान, एका ठिकाणी पत्रकारांशी बोलताना अमोल कोल्हे यांना राज्यसभेच्या निवडणुकीसंदर्भात प्रश्न विचारला. यावर त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, छगन भुजबळ हे फार मोठे नेते आहेत आणि मी त्यांचा त्रागा समजू शकतो. कारण जी काही आधी चर्चा झाली होती, आता विशेषत: जातनिहाय जनगणना होत असताना, ओबीसीचा कॉलम जातनिहाय जनगणनेत नसताना, छगन भुजबळ यांच्यासारखे वरिष्ठ नेते संसदेत असणे ही फार महत्त्वाची गोष्ट होती. आमच्यात जी काही प्राथमिक चर्चा झाली होती त्यामध्ये अजित दादांनी एकदा आम्हाला ओघाने सांगितले होते की, कदाचित छगन भुजबळ हे राज्यसभेवर असतील, अशी एक चर्चा आमची अंतर्गत झाली होती, असा गौप्यस्फोट कोल्हे यांनी केला आहे.

## तक्रार देण्यासाठी गेलेली तरुणीच बळी; फौजदाराविरुद्ध बलात्काराचा गुन्हा

**छत्रपती संभाजीनगर :** मोबाइल हरवल्याची तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात गेलेल्या एका 23 वर्षांच्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका पोलिस उपनिरीक्षकाने पीडितेचा विश्वास संपादन करून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले आणि तिची इच्छा नसताना तीन वेळा गर्भपात घडवून आणल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकारी, त्याची पत्नी आणि मुलावर क्रांती चौक पोलिस ठाण्यात अत्याचार व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले. सुभाष चव्हाण, पत्नी नर्मदा चव्हाण आणि सागर चव्हाण अशी आरोपींची नावे आहेत.

"मी मूळ नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असून, सध्या पुण्यात खासगी नोकरी करते. मार्च 2025 मध्ये माझा मोबाइल हरवल्याने मी क्रांती चौक पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते. तिथं माझी भेट पीएसआय सुभाष चव्हाण यांच्याशी झाली. त्यांनी माझा नंबर नोंदवून घेतला आणि त्याच रात्री फोन केला. त्यानंतर आमच्यात फोनवर बोलणं सुरू झालं आणि त्यांनी मला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. काही दिवसांनी त्यांनी माझा मोबाइल सापडल्याचं सांगून मला संभाजीनगरला बोलावलं. एका हॉटेलमध्ये चहा घेण्यासाठी गेल्यावर त्यांनी मला माझ्या जातीबाबत विचारणा केली. त्यानंतर त्यांनी मला लग्नाचे आमिष दाखवले. 'मी तुझ्याशी लग्न करेन, तुला कधीच सोडणार नाही,' असं म्हणत त्यांनी माझा विश्वास संपादन केला आणि शहरातील विविध लॉजवर नेऊन माझ्यावर वारंवार अत्याचार केले. त्यांनी मला अहिल्यानगर (अहमदनगर) येथे नेऊन गळ्यात बनावट मंगळसूत्र बांधून 'आता तू माझी बायको आहेस,' अशी खोटी हमी दिली.

मी गर्भवती राहिल्यानंतर त्यांनी माझी इच्छा नसताना पुण्यात माझा पहिला गर्भपात घडवून आणला. नोव्हेंबर 2025 मध्ये संभाजीनगरमध्ये खोटं सांगून त्यांनी माझा दुसरा गर्भपात केला. जेव्हा मी लग्नासाठी तगादा लावला, तेव्हा त्यांनी मला जातिवाचक शिवीगाळ करत मारहाण केली आणि खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

"जानेवारी 2026 मध्ये मी पुन्हा त्यांना भेटण्यासाठी आले असता, त्यांनी मला जातीवरून हीन वागणूक दिली. 'मी उच्च जातीचा असून, तुझ्यासारख्या मुलीशी लग्न करणार नाही,' असं म्हणत मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या पत्नी आणि मुलानंही मला गाठून मारहाण केली. आरोपीच्या पत्नीनं 'माझ्या पतीचा पाठलाग सोडून दे,' असं म्हणत पोटावर मारहाण केली. ज्यामध्ये माझा तिसऱ्यांदा गर्भपात झाला. सततची फसवणूक आणि शारीरिक-मानसिक छळाला कंटाळून अखेर मी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ फेब्रुवारी २०२६

# ज्युलीच्या शब्दांनी नग्न झालेली सत्ता

ब्रॉन्क्सच्या रस्त्यांवर कचऱ्याचा दर्प,
फ्लोरिडाच्या हवेलीत फ्रेंच परफ्युम—
यातच लोकशाहीची व्याख्या दडलेली.
गरीबांच्या गल्लीला दुर्गंधी,
श्रीमंतांच्या पापांना सुगंध.

एपस्टाईनच्या बेटावर मुली विकल्या,
मुंबईच्या फॉकलंड रोडवरही.
फरक इतकाच—
तिकडं डॉलर, इकडं रुपयांचे;
पण देहाचं दरपत्रक
जगभर एकाच काळ्या चलनात.

कायदा सत्ताधीशांच्या ड्रॉईंगरूममधला शोपीस,
न्याय त्यांच्या ग्लासात विरघळणारा एक शब्द.
रात्री शहर झोपतं,
पण सत्तेच्या बेडरूममध्ये
बालपणाचं शवविच्छेदन सुरू असतं—
सत्तेच्या रेशमी अंधारात,
हसऱ्या राजकीय चेहऱ्यांच्या मागे.

अशा जगात ज्युली उभी राहते—
हातात शस्त्र नाही,
हातात फक्त प्रश्न.
आणि प्रश्न हेच
गरीबांचे खरे अस्त्र.

ती जेलच्या काँक्रीट भिंतींना हात लावते—
त्या भिंतींवर अजूनही
नाव नसलेल्या मुलींचा घाम चिकटलेला.
ती कोर्टरूममध्ये फाइल्स उघडते—
प्रत्येक फाइल म्हणजे
सत्ता, कायदा आणि मौन
यांनी केलेली संयुक्त सही.

ती त्या स्त्रियांना भेटते
ज्या कधी मुली होत्या.
हवेल्यांच्या कार्पेटवर गळलेला घाम
अजूनही त्यांच्या शब्दांत जिवंत राहतो.
“मालिश” म्हणजे सौदा,
“मौन” म्हणजे करार,
“पैसा” म्हणजे अपराधावरची शाई.

ती लिहिते—
कारण मौन ही सत्तेची मातृभाषा,
आणि लेखन म्हणजे
त्या भाषेवर उच्चारलेला दोषारोप.

“विकृतिचा न्याय” प्रसिद्ध—
भांडवलशाहीच्या पांढऱ्या सूटवर
पडलेला एक रक्ताचा डाग.
राजे, राष्ट्राध्यक्ष, राजकुमार—
बँकदार, उद्योगपती, खेळाडू—
गोडधंद्यातली नावे
हकीकत उघडत एकामागोमाग चमकतात.
एपस्टाईन पकडला जातो.
पण एपस्टाईन व्यक्ती नव्हता—
तो एक व्यवस्था होता:
पितृसत्तेचा दलाल,
भांडवलशाहीचा दलाल,
जात, वर्ग आणि लिंग यांचा
अंधारात मिळणारा संगम.

एका राजधानीत संगमरवरी छत,
दुसऱ्यात पत्र्याचं.
पण दोन्ही छताखाली
स्त्रियांची किंकाळी
एकाच भाषेत लिहिली जाते.

ज्युलीला पुरस्कार मिळतात—
व्यवस्थेने स्वतःला दिलेली क्षमा.
ती हसत नाही.
ती पुस्तक लिहीत राहते—
कारण काही गुन्हे वर्तमानपत्रात मरत नाहीत;
ते इतिहासात जखम म्हणून टिकतात.

ज्युली पत्रकार नाही.
ती गल्ली, हवेली, जेल, संसद—
सर्वांतून उठणारी अस्वस्थ चेतना आहे.
जिथे सत्ता देह विकते,
तिथे ती शब्दांनी सत्ता नग्न करते.

न्याय प्रार्थनास्थळात नव्हता—
तो गल्लीच्या भिंतीवर ओरडणाऱ्या पोस्टरमध्ये होता,
आणि एका स्त्रीच्या थरथरणाऱ्या हातात.

ज्युली—
हा त्या थरथरणाऱ्या हाताचा ठसा आहे,
संगमरवरी सत्तेच्या चेहऱ्यावर
इतिहासाने कोरलेला, कधीही न पुसला जाणारा.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# कृषीक्रांती चा आधारवड हरपला, जयराम थोरात यांच निधन



**कन्नड (अरुण थोरात) :** अती दुर्गम भागात वसरेल्या कळंकी ता.कन्नड येथील प्रगत शेतकरी जयराम लक्ष्मण थोरात (वय १०२ वर्षे) यांचे दि. २० फेब्रुवारी रोजी निधन झाले.कोणतेही भौतिक कृषी साधने नसतांना आपल्या मुरमाड खडकाळ जमिनी वरती नंदनवन फुलविणार्या व अध्यात्मिक, कृषी क्षेत्रातील पुरस्कार, सन्मानीत कळंकीचे माजी सरपंच तथा महाराष्ट्र शासनाच्या वसंतराव नाईक कृषीरत्न पुरस्काराने सन्मानित जयराम लक्ष्मण थोरात यांचे दि.२० फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.अत्यल्प शिक्षीत असून ही जयराम नाना थोरात यांनी आधुनिक शेतीची कास धरली सत्तर च्या दशकात त्यांनी आपल्या मुरमाड, खडकाळ जमिनीवर बैल मोट नाडीच्या सहाय्याने शेतीस सुरुवात केली. पारंपरिक शेतीला फाटा देत फळबाग शेतीत आंबा, सिताफळ, द्रांक्ष, ऊस शेतीची पायाभरणी करीत. कृषीक्रांती चा श्रीगणेशा केला. ऊस शेतीला चालना देत पारंपरिक गुर्हाळ सुरु करुण अर्थाजना बरोबरच अनेकांना रोजगार उपलब्ध करुण दिला. त्यांचा आदर्श समोर ठेवत कन्नड तालुक्यात अनेक गावांत गुर्हाळे सुरु झालीत. १९७२ च्या दुष्काळात अनेकांसाठी आपली धान्य कोठारे मोकळी केली. लग्न, आजारण, आर्थिक परिस्थितीत गांजलेल्यांना आर्थिक मदत करुण विस्कटलेली घडी बसविली. एरवी नाशिक जिल्ह्यातील द्रांक्ष व पुढे डाळींब शेती अतिदुर्गम कळंकी गावात आणली. १९७२ च्या दुष्काळात त्यांनी ग्रामस्थांना धान्य आदी मदत करुण माणुसकी जमली. तोरण मरणदारी हजेरी लावून सुख दुखात साथ दिली. प्रगतशील शेती करतानाच त्यांनी आध्यात्मिक परंपरा जोपासली. हाडाचे वारकरी असलेले नाना. शेवट पर्यत आपल्या भावी पिढीला अध्यात्मिक दान धर्म जपण्याची प्रेरणा दिली. हरिनाम सप्ताह, पंढरीची वारी यात दानधर्म करीत. वारकरी जिवनाची साधना केली. साधी राहणी, सत्वशिल विचारसरणी यातून नवा आदर्श निर्माण केला. अर्धोर्जन जोपासतांना संयुक्त कुटूंब व्यवस्थेततच उन्नती चा मार्ग असल्याचे कृतीतून दाखवून दिले. समाजकारणा बरोबरच गावाच्या प्रगतीचा विचार मनाशी बाळगत गावाचे सरपंच पद भुषविले. ग्राम व्यवस्थेत अनेक क्रांतीकारी धाडसी निर्णय घेतले. पुरेपूर क्षमता असतांना व जनमाणसात स्थान असतांना ही तालुक्याच्या राजकारणात न पडता. ग्राम सुधारणेत भर दिला. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक कृषीरत्न पुरस्काराने त्याच्या कुटूंबियांना सन्मानित करण्यात आले. तसेच विविध कृषि विद्यापीठांनी त्यांचा गौरव केला. अध्यात्मिक क्षेत्रात ही अनेक सन्मान त्यांना मिळाले. प्रसिध्दी ची हवा डोक्यात न जाऊ देता त्यांनी साधी राहणी व अध्यात्मिक विचारसरणी शेवट पर्यत जोपासली. आयुर्वेदिक औषधींचे उत्तम ज्ञान संपादन करीत रात्री अपरात्री रुग्णांच्या हाकेला प्रतिसाद देत बालक, प्रौढांना दिलासा दिला.जनसेवेचे व्रत घेतलेला हा आधारवड दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी वैकुंठशासी झाला. त्यांच्या या जाण्याने सबंध पंचक्रोशी सह तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

# शासकीय कामात अटकाव; आरटीओ अधिकाऱ्यास धमकी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** करोडी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आर.टी.ओ.) ड्रायव्हिंग टेस्टदरम्यान उमेदवाराने मोटार वाहन निरीक्षकास धमकी देत शासकीय कामात अटकाव केल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली.मिळालेल्या माहितीनुसार, मोटार वाहन निरीक्षक राजश्री संजय सोळके या आरटीओ कार्यालय, करोडी येथे कार्यरत असून त्या परमनंट लायसन्स चाचणी घेत होत्या. दि. 20 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 वाजेपर्यंत सुमारे 25 उमेदवारांची चाचणी पार पडली होती.दुपारी सुमारे 1 वाजण्याच्या सुमारास रायगड ड्रायव्हिंग स्कूलची गाडी (क्र. MH-२०-BN-०७४९) वर उमेदवार राजू हरसिंग सोनवणे (वय 39, रा. दरेगाव पाडळी, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर) हा चाचणी देत होता. वाहन चालविताना तो डगमगत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी त्याला गाडी बाजूला घेण्यास सांगितले.यावरून संतप्त झालेल्या उमेदवाराने आरडाओरड करून गोंधळ घालत “मला टेस्टमध्ये पास करा, नाहीतर तुम्हाला बघून घेईन” अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक रफीक पठाण हे करत आहे.

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ फेब्रुवारी २०२६

## जीवनात यशस्वी होण्यासाठी शिवचरित्राचे वाचन करा - डॉ. राजेश करपे



**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे इतिहास विभागाच्या आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.डॉ.महाराजांच्या जयंती निमित्त राजेश करपे पाचारण करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना ते म्हणाले शिवजयंती साजरी करताना शिवचरित्राचे विकृतीकरण करणे टाळून शिवचरित्रातील शिवरायांच्या कर्तुत्वाचे प्रामाणिक स्मरण केल्यास व्यक्तीच्या जीवनाला योग्य दिशा मिळाल्याशिवाय राहत नाही .जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिवचरित्राचे वाचन करावे. शिवरायांच्या अंगी जिद्द धैर्य त्याग याप्रमाणे समता बंधुता प्रेमभाव तसेच राष्ट्रभक्ती मातृभक्ती हे सर्व गुण असल्यामुळे आज ४०० वर्षांनी ही त्यांच्या लोकप्रियतेत वाढत होताना दिसत आहे असे ते म्हणाले.कार्यक्रमाच्या प्रारंभी .राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे हे होते यावेळी मंचावर संस्था सहसचिव श्रीमती रोहिणी जोशी उद्योजक भगवानराव मुळे उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी शिवचरित्रातील एक जरी गुण विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जीवनात अंगीकारला तर तो यशस्वी निश्चित होतो असे प्रतिपादन केले. यावेळी लोकसेवा महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित व्यसनमुक्ती निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त भाग्यश्री पठाडे तिच्यासह सहभागी विद्यार्थी योगेश पिंपळे व नेहा घावटे यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .योगेश शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा.मनोज देवकर यांनी केले तर आभार डॉ .नानासाहेब लावंड यांनी मानले.या कार्यक्रमासाठी डॉ.बाळासाहेब लिहिणार डॉ नरेश डहाळे डॉ लक्ष्मण दांडगे डॉ नितीन मुळे डॉ निखिल साबळे, लक्ष्मण खरात सुखदेव पोटदुखे,डॉ. अमीत राऊत,आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा मनोज देवकर यांच्यासह रमेश कचरे, ललित गोल्डे, डॉ जयश्री पाटील, डॉ. किशोर काळे , प्रा.रामदास घोडके अविनाश साळवे, कैलास जाधव, भगवंत देशपांडे, सुनीता पारेकर, रमेश जाधव,मधुकर राठोड ज्ञानेश्वर जाधव यांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत बहिरगाव प्रशालेचे घवघवीत यश



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव ता.कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त कन्नड येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत आपल्या कल्पकतेच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत बहिरगाव शाळेतील साधना शंकर शिरसे हिने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. तिला पाचशे रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच वैष्णवी गणेश बनकर हिने तृतीय क्रमांक संपादन केला असून तिला तीन शे रुपये रोख आणि सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेविजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार कन्नडच्या तहसीलदार श्रीमती सारिका भगत, पोलीस निरीक्षक आर. बी. सानप, पोलीस उपनिरीक्षक कुणाल सूर्यवंशी आणि नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांना शाळेचे कला शिक्षक सलीम आतार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप व सर्व शिक्षक वृंदानी शाळेत त्यांचा विशेष सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, श्याम खोसरे, सलीम आतार, श्रीमती किरण पाटील, राधेश्याम शर्मा, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसना बाई गोरे आणि सविता कुंटे यांची उपस्थिती होती.

## प्रा. डॉ. किशोर वाघ यांना राज्यस्तरीय राष्ट्रसंत गाडगेबाबा समाजरत्न पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी सुप्रसिद्ध कवी -गायक तथा राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री येथील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक व संशोधक प्रा. डॉ. किशोर वाघ यांना त्यांच्या सांस्कृतिक,शैक्षणिक व सामाजिक कार्यातील विद्यार्थी दशेपासून नोंदवलेल्या सक्रिय सहभागाबद्दल संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था, परळी यांच्या वतीने नुकताच " संत गाडगेबाबा राज्यस्तरीय पुरस्कार -२०२६ जाहीर करण्यात आलेला आहे. संस्थेच्या वतीने सचिव पृथ्वीराज शिंदे यांच्या वतीने निवड पत्र पाठवले असून त्यात राष्ट्रसंत संत गाडगेबाबा यांच्या शतकोत्तर जयंती उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस व ज्येष्ठ प्रबोधनकार ह-भ-प ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांच्या हस्ते व विशाल लोंढे उपायुक्त बार्टी, पुणे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी येथे दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. किशोर वाघ यांना यापूर्वी सुद्धा अनेक सामाजिक व सांस्कृतिक पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



**विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ फेब्रुवारी २०२६


## आलीस आणि...

तू आलीस आणि
वाऱ्यालाही दिशा मिळाली,
माझ्या बेचैन श्वासांना
तुझ्या नावाची सवय लागली...
तुझ्या डोळ्यांत पाहताना

आकाशही थांबतं जरा,
तारुण्याच्या या धुंदीत
मन होतं वेडंवाकडं सारा...

तुझ्या हसण्याचा उजेड
सूर्यालाही लाजवतो,
तुझ्या स्पर्शाच्या सावलीत
माझा प्रत्येक दिवस फुलतो...

रात्र जशी चांदण्यांनी सजते,
तशी तू माझ्या स्वप्नांत येशील,
मी शब्दांत शोधतो तुला,
आणि तू हृदयातच सापडशील...

तुझ्याविना हे तारुण्य
अधुरं, बेचैन, अपुरं,
तू असलीस की जगणं
संपूर्ण, सुंदर, भरपूर...

तू म्हणजे माझ्या आयुष्याचा
पहिला गोड ध्यास,
तारुण्याच्या या प्रेमाला
फक्त तुझाच श्वास...

**कवि - भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई**

## आशेचा हिरवा कोंब

ओंजळीतून निसटून जावी
वाळू नर्मदेची अलगद
तसे निघून गेले क्षण
आयुष्याच्या सकाळचे सोनेरी..

अन् स्वप्नं ही हरवून गेले
ऊन डोईवर तापल्याने..आताशा..

आता स्वप्नं अन् वास्तवाची
भेट होत नाही
स्टेशन कधीचेच चुकल्याने..

आता वाढलंय वय
वाकले खांदे
जबाबदारीच्या असह्य ओझ्याने..

पाठीवरचे आधाराचे हात ही
निघून गेले दिगंताच्या प्रवासाला..

आता डोक्यावरचे केसही
सोडू लागले साथ
ऊन कलल्याने..

म्हणून सुचत नाही कविता
हिरव्या दिवसावर..

तरीही जपतो आहे
उरात आशेचा हिरवा कोंब
माझ्या वैराण वाळवंटाला
दान हिरवाईचं देण्यासाठी..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

## व्यावसायिक हुरडा पार्ट्यांच्या गर्दीत ग्रामीण भागात अजूनही जपली जाते माणुसकीची परंपरा.




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहरी भागात हुरडा पार्ट्यांचे व्यवसायिकीकरण झालेले असताना ग्रामीण भागात पारंपारिक हुरडा पार्ट्यांवर शेतकरी बांधव देखील भर देताना दिसत आहे. महाराष्ट्रासह सीमावरती ग्रामीण भागात हिवाळ्यात रंगणाऱ्या हुरडा पार्ट्यांचा उत्साह यंदाही ओसंडून वाहताना आहे. उमरगा तालुक्यातील बिराजदार वस्तीतील कलाप्पा पाटील यांनी आपल्या मित्र परिवाराला एकत्रित आणून शेतात हुरडा पार्टी गुरुवारी (ता. १९) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न केली. शहरातील लोकांना शेतीची ओळख व्हावी, ग्रामीण परंपरा जपल्या जाव्यात, नवीन पिढीला शेती संस्कृतीची ओळख व्हावी, याकरिता या अनोख्या पार्टीचे आयोजन केले जाते. यामुळे सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होते. रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गोविंद पाटील, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, संतोष कांबळे, उपप्राचार्य कलय्या स्वामी, मल्लिकार्जुन बदोले, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार वाकडे, प्रा. भूषण पाताळे, शरणाप्पा धुम्मा, सहशिक्षक नागनाथ बदोले आदींनी याचा आस्वाद घेतला. हुरडा म्हणजे ज्वारीच्या कोवळ्या कणसांना शेतातल्या चुलीवर भाजून थेट ताटात तयार केलेला पारंपरिक खाद्यपदार्थ. शेतातच कणसे भाजून त्यासोबत लसूण चटणी, शेंगदाण्याची चटणी, गूळ, चिवडा, खारमुरे, पेंडखजूर, उसाचा रस यांचा आस्वाद घेण्याची खास मेजवानी यावेळी ठेवण्यात आली होती. ग्रामीण भागातील पारंपरिक पद्धतीने चुली पेटवून हुरडा तयार करण्यात आला. याप्रसंगी शेतकरी विठ्ठल कुडवकल, सुनील कुडवकल यांनी हुरडा परंपरेचे महत्त्व सांगितले. हुरडा पार्टी ही केवळ खाद्य मेजवानी नसून शेतकरी संस्कृतीचा एक उत्सव आहे. निसर्गाशी नाते जपण्याचा हा एक सुंदर मार्ग असून हा गावरान मेवा असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी साऊंड सिस्टिम लावून वातावरण निर्मिती करून लोकगीतांचे सादरीकरण, पारंपरिक खेळांचे आयोजन, मनोरंजनात्मक विषयांवर चर्चा घडवून आल्या. हुरडा पार्टीच्या उत्साहात रसवंती चालक महादेव मुळे, नरसप्पा पाटील, मल्लिनाथ पाटील यांनी विशेष पुढाकार घेऊन आपुलकीने खाऊ घालण्यावर भर दिला. यामुळे आलेल्या सर्वांनाच आपल्या भारतीय परंपरेचे दर्शन दिसून आले.

## जिंतूर शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** प्रतीवर्षाप्रमाणे यंदाही जिंतूर शहरात बहुजन प्रतिपालक, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण तथा रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा जयंती सोहळा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन संपूर्ण शहरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.जयंतीनिमित्त शहरातील प्रमुख मार्ग भगव्या पताकांनी सजविण्यात आले होते. सकाळी ९ वाजता नियोजित पुतळा परिसरात जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शिवजन्माचा पाळणा, प्रतिमा पूजन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर अण्णाभाऊ साठे चौकातून तहसीलदार शीतल कच्छवे, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे तसेच नायब तहसीलदार गायकवाड यांच्या हस्ते पूजन करून भव्य मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.या मिरवणुकीत अश्वारूढ बालशिवाजीराजे, माँ साहेब जिजाबाई, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या वेषभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शिवशाही मर्दानी आखाड्याच्या वतीने शिवकालीन तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी यांसारख्या युद्धकौशल्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.तसेच कस्तुरबा गांधी विद्यालय, एकलव्य बालविद्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, ऑरचिड इंग्लिश स्कूल आदी शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लेझीमचे विविध प्रकार सादर करत मिरवणुकीची शोभा वाढवली. ढोल पथकाच्या दमदार तालावर महिला व तरुणींनी भगवे फेटे बांधून सहभाग घेतल्याने संपूर्ण वातावरण भगवेमय झाले होते.मिरवणूक शहरातील मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात समारोप करण्यात आला. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.चौकट : राजकीय पुढाऱ्यांनी केले अभिवादनछत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी मिरवणुकीत सहभागी होऊन अभिवादन केले. यामध्ये नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे, नगरसेवक पिंटू चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे, पिंटू डोंबे, नगरसेवक ॲड. गोपाळ रोकडे, टिका खान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector


सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# पुस्तक परीक्षण "रानफुले" (काव्यसंग्रह)




**क**वी 'श्रीकांत आसाराम गायकवाड'यांचा पहिलाच "रानफुले" हा काव्यसंग्रह असून , ते जिल्हा परिषद शाळेत माध्यमिक शिक्षक असून, हिवर्डी ,ता.जि. जालना येथील असून, सध्या जालना शहरात त्यांचे वास्तव्य आहे. हा कविता संग्रह आई~वडिलाना समर्पित केलेला आहे. श्रीकांत गायकवाड हे शांत व संयमी स्वभावाचा कवी आहेत. त्यांच्या कवितेमधून गाव शिवाराची अनुभूती व ग्रामीण जीवन दिसते. यामध्ये एक जैविक नाते दिसून येते. या काव्यसंग्रात रान आणि फुले यातील रान म्हणजेच शिवार, शिवारातील, निसर्ग ,वृक्ष लतावेली बहरलेली फुले... म्हणजेच शेतशिवार याचे दर्शन घडते. गाव शिवार हा केंद्रबिंदू घेऊन कवीने शेतकरी, कष्टकरी व शेतमजूर यांच्यावर कविता लिहिल्या आहेत, माती पाऊस, गंध ,पाखर, माती ,धरणी ,जमिनी यासारख्या शब्दांचा कवीला मोह आवरत नाही. माय~ लेकरा मधील असलेली माया कवितेतून दिसते. "हळभर वाटलेल्या, गाई माईचा पान्हा, होई कासात मोकळा, चूर कुशीत तान्हा. स्त्रियाच्या वाटेला आलेल्या जगण्याचा वेध अत्यंत अचूक शब्दात कवीने टिपलेला आहे .त्या दृष्टीने "अंग" ही कविता फार बोलकी आहे. ज्वारी ,सुगी गणेश, लगबग, गाठभेट, लेण या कवितांमधून निसर्गाचं रूप व आकर्षण कवीने मांडला आहे. ऊसतोड कामगाराच्या दु:खाला वाचा फोडणारी. " सय" ही कविता उल्लेखनीय आहे. ऊस साडता साडता, उस तोडीच्या रानात, पिल्ल दुर घरट्यानं सई कालावल्या पोटात किंवा मोळी बांधता बांधता नाग फुसकारले सरित काळजाच झालं पाणी, घर बुडाल डोळ्यात. यामधून ऊस तोडी ला जाणाऱ्या स्त्रियांची व्यथा वेदना कवी गायकवाड यांनी मांडली आहे. आपल्या कवितेमधून वाड्याबद्दल व गडीबद्दल वेगळा भाव "नवीगढी" या कवितेतून व्यक्त करतात. कधी वाटे या कवितेतून लिहिताना, "कधी वाटे मिठीत कवटाळावे आकाश डोळ्यातल्या आसवांनी ओलं करावं ढगास". परंतु बऱ्याचशा कवितेत रान, शेत , स्त्रिया, माय, लेकरू पाऊस, पीक आणि कुटुंबातील नातेसंबंधांचे वर्णन दिसते. "राशी" या कविते या कवितेत शेतात राबणाऱ्या श्रमिक शेतकऱ्याचा सन्मान केला असून, "रोजंदारी"या कवितेत शेतमजुराची व्यथा मांडलेली आहे. कंबर गळाली तरी पाटा कडेला नेई, इच्चू मारी नांगी, भडका उठे हाताला, पीक कापीत गंजी रचत नेई झाकड पडे आणि सरपण भारा तव्याचुल पेटे सांजाला, दु:ख असो, सुख हप्ताभर कामकरी मीठमिरची मसाल्यान घर चालवी रोजनदारी! आजच्या समाजातील शेतमजुरांचं हे भीषण वास्तव कवी श्रीकांत गायकवाड यांनी रेखाटले आहे. काळयाआईचं व गावपंढरीचा विविध भावविश्व या कविता संग्रहातून, कवी श्रीकांत गायकवाड यांनी रेखाटलेले आहे . अमरावती येथील पायगुण प्रकाशन संस्थेने हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून, याचे स्वागत मूल्य ४८/~ रुपये आहे. वाचकांना शेत~शिवारात रमवणारा हा काव्यसंग्रह आहे.

**पुस्तक परिचय~ रानफुले (काव्यसंग्रह)**
**कवी~श्रीकांत गायकवाड.**
**समीक्षक~ प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे.**
**(जेईएस महाविद्यालय जालना.)**
**भ्रमणध्वनी~९४२१३१९२७०**

## फुलला पळस

फुलला पळस
चैतन्य बहरले मनी
कोकिळेची कुहू कुहू
साद घाले माळरानी

फुलला पळस
वसंताची लागे चाहूल
फुलपाखरे गोळा होती
पाहूनी केशरी फुलं

फुलला पळस
पानझड झाली वृक्षांची
केशरी फुलांचा सडा
येता झुळूक वाऱ्याची

फुलला पळस
उभ्या डोंगराच्या कुशीत
होळीच्या स्वागताला
सजला कसा खुशीत

फुलला पळस
फाल्गुनाच्या तप्त उन्हात
शृंगारलेले मोहक रुप
सदा राही मनात



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

